☎ – 📠 : 022–22700477 3
EMAIL : gposhc.2011@gmail.com
तातडीचे/कालमर्यादा

जा.क्र.आस्था/ 12591 (HA)
सरकारी वकीलांचे कार्यालय,
उच्च न्यायालय, मूळ शाखा,
मुंबई – 400 032.

दि. :– 19/11/2012.

प्रति,
सू. ब. दळवी,
कार्यासन अधिकारी, कार्यासन – 21,
विधी व न्याय विभाग, मंत्रालय,
मादाम कामा रोड, शहीद राजगुरू चौक,
मुंबई.

विषय :– नागरिकांची सनद प्रसिध्द करणे हा विषय सन 2012–13 साठीच्या केआरए मध्ये समाविष्ट करणे.

संदर्भ :– आपले पत्र क्र. संकीर्ण 2012/1702/प्र.क्र.99/का.–21, दि. 16/11/2012.

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, आपणास हवी असलेली या कार्यालयातील नागरिकांच्या सनदेसंदर्भातील माहिती सोबतच्या सी.डी. मध्ये भरून आपणाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवित आहोत. तसेच आपण दिलेल्या swapnilkapadnis77@gmail.com या ई–मेलवर सदरची माहिती पाठविण्यात आलेली आहे. कृपया पोच द्यावी.

सोबत :– नागरिकांची सनद.

(धैर्यशील आ. नलवडे)
सरकारी वकील,
उच्च न्यायालय, मूळ शाखा,
मुंबई.

प्रत :–
कार्यासन अधिकारी,
कार्यासन–7, विधी व न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई.

☎-📠 : 022-22700477
EMAIL : gposhc@gmail.com

## विवरणपत्र

| | | |
|---|---|---|
| कार्यालयाचे नाव | :- | सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई. |
| पत्ता | :- | सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, मूळ शाखा, जुनी सा.बां.वि. इमारत, तळ मजला, खो. क्र. 12, हुतात्मा चौक, मुंबई- 400 032. |
| कार्यालय प्रमुख | :- | सरकारी वकील, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई |
| मंत्रालयातील कोणत्या खात्याच्या अधिनस्त | :- | विधी व न्याय विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई. |
| कार्यक्षेत्र | :- | बृहन्मुंबई |
| कार्यानुरुप | :- | उच्च न्यायालयाशी संबंधीत कामकाज |
| विशिष्ट कार्य, ध्येय, धोरण | :- | उच्च न्यायालयामध्ये शासनाच्यावतीने शासनाची बाजू मांडणे व शासनातर्फे न्यायालयात दावे दाखल करणे, तसेच शासनातर्फे दाखल झालेल्या दाव्यामध्ये शासनाची बाजू न्यायालयात मांडणे. |

**शासकीय अधिवक्ता उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई या कार्यालयाच्या स्थापनेमागील पूर्व पिठीका:-**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या देशाने संसदीय लोकशाहीचा अंगिकार केला. 26 जानेवारी, 1950 ला लिखित संविधानाव्दारे प्रजासत्ताक लोकशाही राष्ट्र झाल्याचे घोषित केले. भारतीय संविधानाने नागरिकांना अनेक मूलभूत अधिकार बहाल केले आहेत. या हक्क अधिकाराच्या संरक्षणासाठी "राईट टू पिटीशन/संविधानानुसार" दाद मागण्याचा अधिकार नागरीकांना बहाल केला आहे. संविधानाच्या अनुच्छेद 226 अन्वये नागरिकांना न्यायालयात दाद मागता येते. या अनुच्छेदान्वये महाराष्ट्र शासनाविरुध्द अनेकविध याचिका उच्च न्यायालयामध्ये प्रवर्तित/दाखल होत असतात. संपत्तीच्या संबंधाने नागरिकांना अधिकार बहाल आहेत. शिवाय संपत्ती संपादित करणे, वारसा हक्काने प्राप्त होणे, संपत्तीचे वारसामध्ये वाटप होणे, यामुळे संपत्ती मालमत्तेच्या अनुषंगाने निर्माण झालेले वादविवाद सोडविण्यासाठी येतात. यासाठी अनेक व्यक्ती शासनाच्या निर्णयाविरुध्द न्यायालयात दावे

☎ : 022-22700477
EMAIL : gpobhc@gmail.com



दाखल करत असतात. शासकिय अधिवक्ता, उच्च न्यायालय, मूळ शाखा, रीट शाखा, या कार्यालयांची स्थापना होण्यापूर्वी शासनाविरूध्दची न्यायालयीन प्रकरणे बाहेरील वकिल वा वकीलांच्या संस्थेकडून हाताळली जात असत.

परंतू, या वकीलांच्या संस्था शासनाला उत्तरदायी नव्हत्या. शिवाय वकील शुल्कापोटी मोठया रक्कमेचा भुर्दंड शासनाला सोसावा लागत होता. शिवाय शासकिय अधिकारी आणि कामकाज चालविणारे वकिल यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव होता. या गोष्टींचा तत्कालीन शासनाने विचार करून शासकिय अधिवक्ता (रीट सेल), शासकिय अधिवक्ता, उच्च न्यायालय, मूळ शाखा, या दोन शासकिय विधी अधिका-यांची कार्यालये अनुक्रमे 1974 आणि 1977 साली स्थापन केली

त्याकरिता नामांकित वकिलांचे साहाय्य घेवून प्रतिष्ठित व्यक्तिंची शासकिय अधिवक्ता म्हणून नेमणूक केली होती. जेणेकरून, शासनाविरूध्दच्या न्यायालयीन प्रकरणामध्ये शासनाची बाजू समर्थपणे मांडण्यासाठी चिरकालीन व्यवस्था असावी.

शासकिय अधिवक्ता, उच्च न्यायालय, हे पद कार्यालय प्रमुखांचे असून या पदावर अनुभव संपन्न व्यक्तीची निवड होते. त्यांना सहाय्य करण्यासाठी अतिरीक्त, सहाय्यक सरकारी वकील यांची नेमणूक होते. तसेच अल्प वा दीर्घ कालावधीसाठी विशेष सरकारी वकिल, अ वर्गीय वरिष्ट वकिल, यांच्या सूचीमध्ये विविध प्रकरणांचा अनुभव असलेल्या नामांकित व्यक्तींचा/वकिलांचा समावेश आहे. शासनाच्या ध्येयधोरणांचे, निर्णयांचे, न्यायालयामध्ये समर्थन खंबीरपणे करता यावे याकरिता ही व्यवस्था आहे. तसेच ही शासकिय विधी अधिका--यांचे कार्यालय शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या नियंत्रणाखाली आणून शासनाच्या ध्येयधोरण, निर्णयांचे समर्थन, बचाव शासनाच्या इच्छेबरहुकूम करू शकतील.

शासकिय अधिवक्ता, मूळ शाखा, या कार्यालयातील कार्यालय प्रमुखांचे पद हे मानद वेतनधारी असून त्यांना व्यावसायिक शुल्क देय आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या अधिनस्थ सहाय्यक सरकारी वकीलांना व्यावसायिक शुल्क विधी अधिकारी नियम 1984 सुधारणा 1990, 2001, 2008 प्रमाणे देय आहे. या सूचीबध्द शासकिय वकीलांच्या साहाय्यासाठी कर्मचा-यांची व्यवस्था आहे. हे कर्मचारी शासकिय कर्मचारी म्हणून गणले जातात त्यांना शासनाच्या वेतनश्रेणीनुसार वित्तलब्धीचा अधिकार आहे. सांप्रत शासकिय अधिवक्ता, मूळ शाखा या कार्यालयामध्ये सर्व कर्मचा-यांवर पर्यवेक्षीय अधिकारी म्हणून आस्थापना अधिकारी या एकल पदांतर्गत एक

लेखापाल तसेच चार अधीक्षक नेमस्थ आहेत. ते विषयानुरूप कार्यासनावर म्हणजे अधीक्षक रीट सेल अधीक्षक अपील, देयक शाखेवरील एक अधीक्षक (विधी अधिका–यांचे व्यावसायिक शुल्काचे देयक तयार करणारी शाखा) आणि भूसंपादन संदर्भ, विक्रीकर संदर्भ आवेदन तसेच मालमत्ताविषयक दावे या संकिर्ण कामाकरिता एका अधीक्षकाची नेमणूक आहे. प्रत्येक शाखेमध्ये एक वरिष्ठ लिपीक नेमस्थ आहे. तसेच आवश्यकतेनुसार पाच ते सात कर्मचारी शाखेमध्ये कार्यरत असतात. या विधी अधिकारी कार्यालयाशी सामान्य जनतेचा प्रत्यक्ष संबंध येत नाही. तसेच या कार्यालयाची कामाची वेळ आणि कामकाज उच्च न्यायालयाला अनुरूप पोषक पध्दतीने चालविली जाते. नागरिकांच्या सेवेसाठी या कार्यालयाचे प्रयोजन नाही वा सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करणे हे उद्दीष्ट या कार्यालयाचे नाही. शासनाविरूध्दची न्यायालयीन प्रकरणे स्वीकारून त्यामधील शासकीय विभाग, विभाग प्रमुख यांना वकीली सहाय्य पुरविणे या सिमीत उद्दीष्टासाठी या विधी कार्यालयाचे प्रयोजन आहे.

<u>विद्यमान कर्मचा–यांचे मंजूर संख्याबळ आणि पदनाम खालीलप्रमाणे आहेत.</u>

| अ. क. | पदाचे नाव | गट | एकूण पदे |
|---|---|---|---|
| 1 | आस्थापना अधिकारी | वर्ग – ब | 1 |
| 2 | लेखापाल | वर्ग – क | 1 |
| 3 | अधिक्षक | वर्ग – क | 4 |
| 4 | पर्यवेक्षी वरिष्ठ लिपीक | वर्ग – क | 8 |
| 5 | लघुलेखक (उच्च श्रेणी) | वर्ग – क | 6 |
| 6 | लघुलेखक (निम्न श्रेणी) | वर्ग – क | 2 |
| 7 | लघुटंकलेखक | वर्ग – क | 1 |
| 8 | लिपीक–टंकलेखक | वर्ग – क | 30 |
| 9 | नाईक | वर्ग – ड | 1 |
| 10 | यंत्रचालक | वर्ग – ड | 1 |
| 11 | शिपाई | वर्ग – ड | 17 |

☎-फोन : 022–22700477
EMAIL : gposhc@gmail.com



या कार्यालयातील वर्ग–क ची सरळसेवेची पदे लघुलेखक (उच्च श्रेणी), लघुलेखक (निम्न श्रेणी), लघुटंकलेखक, लिपीक–टंकलेखक ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील आहेत. तसेच वर्ग – ब चे आस्थापना अधिकारी पद तसेच वर्ग–क मधील अधिक्षक/लेखापाल, पर्यवेक्षी वरिष्ठ लिपीकाची सर्व पदे तसेच लघुलेखक (उच्च श्रेणी), लघुलेखक (निम्न श्रेणी) व लघुटंकलेखकांची काही पदे ही पदोन्नतीच्या कक्षेतील आहेत. वर्ग – ड मधील शिपायांची पदे सरळसेवेने जाहिरात देवून तसेच सेवाविनीयोजन कार्यालयाकडून भरण्यात येत आहेत. वर्ग– ड मधील नाईक व यंत्रचालक ही पदोन्नतीची पदे आहेत.

(धैर्यशील आ. नलवडे)
सरकारी वकिल,
उच्च न्यायालय, मूळ शाखा,
मुंबई.

Nagrikanchi Sanad/ 92/